


## सेंटरची रूपरेषा

हे सेंटर मुंबईतील गोरेगांव स्थित केशव गोरे स्मारक ट्रस्टतर्फे चालवले जाते. ट्रस्टची स्थापना १९५८मध्ये झाली. या सेंटरचे जयंत धर्माधिकारी हे संचालक असून वर्षा राजन बेरी सेंटरच्या समन्वयक म्हणून काम पाहतात. पुष्पा भावे, गजानन खातू, जतिन देसाई, सुरेखा दळवी, युवराज मोहिते, प्रमोद निगुडकर, अमरेंद्र धनेश्वर आणि नसरीन कॉंट्रॅक्टर हे सेंटरच्या मध्यवर्ती समितीचे सदस्य आहेत.

ॲडमिरल (निवृत्त) एल.रामदास, अरुणा रॉय, मेधा पाटकर, योगेंद्र यादव, कमला भसिन, दत्ता इस्वलकर, विभूती पटेल, मीना मेनन (सर्व भारतीय), शेरी रहमान, करामत अली (पाकिस्तान), डॉ. सीमा समर (अफगाणिस्तान), निमल्का फर्नांडो (श्रीलंका) आणि खुशी कबीर (बांगलादेश) हे सल्लागार समितीचे सदस्य आहेत.

२०१४च्या डिसेंबरमध्ये टाटा सामाजिक विज्ञान (टिस) या संस्थेच्या सहकार्याने **हिंसा-एक मानवीय आणि राजकीय आपत्ती** (व्हॉयलन्स - अ ह्युमन अँड पोलिटिकल प्रेडिकॅमेंट) या विषयावर दक्षिण आशियाई परिषदेचे यशस्वी आयोजन केले. हीच सेंटरच्या कामाची सुरुवात होती. सुमारे ३०० प्रतिनिधींनी परिषदेत भाग घेतला. परिषदेत मांडण्यात आलेल्या साधक बाधक विचारांचा समग्र अहवाल व्यापक पातळीवर पोहोचवण्यात आला. इथूनच सेंटरच्या आणि टिसच्या परस्पर सहकार्याचा प्रदीर्घ श्रीगणेशा सुरु झाला.

परिषदेत तयार करण्यात आलेल्या आराखड्यानुसार आता सेंटर **दक्षिण आशियाई पुरुषसत्ताक व्यवस्था** या विषयावर भारतातील वेगवेगळ्या प्रदेशात आणि दक्षिण आशियातील विविध देशांत कार्यशाळांचे आयोजन करत आहे.

पहिली कार्यशाळा २०१५च्या जूनमध्ये पुण्यात **प्रतिष्ठेच्या नावाने घडणारे गुन्हे** या विषयावर घेण्यात आली. हिंसा, पुरुषसत्ताक व्यवस्था, जागतिकीकरण आणि गोंधळलेली आधुनिकता यांचा शोध घेत त्यांच्या परस्पर संबंधांचा विचार या कार्यशाळेत करण्यात आला.

या मालिकेतील दुसरी कार्यशाळा २०१५च्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये **वाढती जातीय, पंथीय अस्मिता, त्यामुळे वाढणारे नियंत्रण आणि स्त्रियांवर होणारे अत्याचार** या विषयावर जयपूरमध्ये घेण्यात आली. उत्तर आणि वायव्य भारतातून १००च्या वर कार्यकर्ते या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

## होय, तुम्ही हे करू शकता!

मृणाल गोरेंच्या स्मृत्यर्थ सुरु झालेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प, शांतिप्रिय आणि न्यायप्रिय समाज असू शकतो, या गोष्टीवर विश्वास असणाऱ्या तुमच्यासारख्या लोकांच्या सहकार्याने आणि उदारहस्ते दिलेल्या आर्थिक मदतीनेच शक्य झालेला आहे.

अशा प्रकारचा मोठा प्रकल्प सातत्याने राबवायचा तर त्यासाठी तीन वर्षांत किमान ४ कोटी रुपयांचा निधी जमविण्याची गरज आहे.

मृणालताईंचे आदर्श कायम जिवंत ठेवणे हे आपल्यासारख्या सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या लोकांचे कर्तव्य आहे असे आम्हाला वाटते - मृणालताईंचे उतराई होण्यासाठी आणि स्वत:साठीसुद्धा!

या कार्याला आर्थिक मदत करून मृणालताईंच्या विचारांच्या प्रसाराला हातभार लावावा असे आवाहन आम्ही तुम्हाला करत आहेत.

चेक आणि ड्राफ्ट केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या नावे काढावेत. १९६१च्या आयकर कायद्यान्वये ट्रस्टला **८०-जी** प्रमाणपत्र मिळालेले असून ट्रस्टची **एफ.सी.आर.ए.**नोंदणीदेखील झालेली आहे.

अधिक चौकशीकरिता खालील व्यक्तींशी संपर्क साधावा:

जयंत धर्माधिकारी - ९८२००३९६९४

वर्षा राजन बेरी - ९८२०६०३७०४





# मृणाल गोरे

## इंटरॲक्टिव्ह सेंटर फॉर सोशल जस्टिस अँड पीस इन साऊथ एशिया

**केशव गोरे स्मारक ट्रस्ट**
आरे रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० ०६२
टेली. (०२२) २८७२४१२३
इ-मेल - mrinalgoreic@gmail.com / kgstmtnl@gmail.com



''जन्म हा प्रत्येक स्त्री-गर्भाचा हक्क आहे आणि स्त्री-अर्भकाची हत्या हा अपराध आहे.'' - **मृणाल गोरे**

मृणाल गोरे (१९२८-२०१२) यांची ओळख करून देण्याची गरज नाही. लढाऊ समाजवादी नेत्या मृणाल गोरे 'पाणीवाली बाई' या नावाने ओळखल्या जात होत्या. त्या मानवी हक्कांसाठी आणि दुर्बल आर्थिक-सामाजिक घटकांच्या हक्कांसाठी प्राणपणाने लढणाऱ्या नेत्या होत्या.

महाराष्ट्राच्या विधानसभेवर अनेकदा मृणालताई निवडून गेल्या होत्या. विरोधी पक्ष नेत्या म्हणून मृणालताईंनी अत्यंत प्रभावीपणे काम केले. १९७७ मध्ये त्या लोकसभेवरही निवडून गेल्या होत्या.

मुंबईतील दुर्बल घटकांच्या मागण्या लावून धरण्यासाठी, त्यांची दु:खे समाजापुढे ठेवण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या महिलांपैकी त्या एक होत. वेगवेगळ्या बंधनांच्या काचातून महिलांना मुक्ती मिळावी म्हणून, त्यांच्यात स्वाभिमान आणि स्वातंत्र्याची आस जागवण्यावर त्यांनी कायम भर दिला.

फक्त शहरापुरतेच आपले कार्य त्यांनी मर्यादित ठेवले नव्हते, तर ग्रामीण क्षेत्रातील जनतेच्या व्यथांशीही त्यांनी नाते जोडले होते.


सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना चांगले शिक्षण, आरोग्य सेवा मिळावी, त्यांचे न्याय्य हक्क त्यांना मिळावेत आणि नाईलाजाने किंवा स्वेच्छेने होणाऱ्या त्यांच्या स्थलांतराला, मानवी व्यापाराला आणि इतर अनेक प्रकारच्या अत्याचारांना आळा बसावा म्हणून त्या लढल्या.

मृणालताई ज्या गोष्टीविरुद्ध लढत राहिल्या, त्या आजही समाजात तशाच आहेत आणि आजही त्यांच्याविरुद्ध लढा चालू ठेवण्याची निकड भासावी हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे.

यापैकी काही प्रश्नांनी आता वेगळे रूप घेतले आहे. उदा. दक्षिण आशियाई देशांत राजकीय क्षेत्रात आता महिलांची संख्या वाढते आहे हे जरी खरे असले तरी त्यांची सामाजिक स्थिती सुधारली आहे असा त्याचा अर्थ होतो की त्यांना अजून पुरुषसत्ताकाच्या दडपणाखालीच वावरावे लागते आहे, हे सांगणे कठीण आहे.

त्यामुळेच मृणालताईंचे काम पुढे नेण्याची आणि वेगाने वाढणाऱ्या जागतिकीकरणाच्या वातावरणात त्याचा अधिक विस्तार करण्याची आजही तितकीच गरज आहे.

वेगवेगळ्या सामाजिक चळवळींशी आणि मृणालताईंच्या कार्याशी संबंधित अशा आमच्यापैकी काही लोकांनी **मृणाल गोरे इंटरॲक्टिव्ह सेंटर फॉर सोशल जस्टिस अँड पीस इन साऊथ एशिया**ची स्थापना केली आहे. मृणालताईंच्या स्मृतीला वाहिलेली ही खरीखुरी श्रद्धांजलीच होय!




## उद्दिष्टे

या सेंटरची अनेक उद्दिष्टे आहेत. लोकांना, जनसमुदायांना आपसात चर्चा करण्यासाठी, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय महत्त्वाच्या मुद्द्यांवर आपापली मते मांडण्यासाठी व्यासपीठ मिळवून देणे, तसेच प्रश्नांचा अभ्यास, मोहिमा हाती घेणे.

जशी मृणालताईंच्या विचारांची, त्यांच्या कार्याची मुळे रुजली मुंबईत, पण पुढे त्यांनी मुंबईची वेसही ओलांडली, तसेच या सेंटरचे विविध उपक्रमही आता दक्षिण आशियाई देशांतल्या महत्त्वाच्या प्रश्नांचा वेध घेऊ लागले आहेत.

सुरुवातीला भारतात सेंटरची सुरुवात करून पुढे सगळ्या दक्षिण आशियातील लोकांपर्यंत पोहोचणे हे म्हणूनच त्यांच्या स्मृतीला समर्पक असे अभिवादन ठरते.



## सेंटरविषयी

**सेंटर मुख्यत: खालील मुद्यांवर भर देते.**

१) दक्षिण आशियातील पुरुषप्रधान प्रवृत्तीवर विचार आणि त्या अनुषंगाने होणारे ऑनर किलिंगसारखे अपराध, स्थलांतरे, जात-पंथापायी होणारी हिंसा, गोंधळलेली आधुनिकता इत्यादी विषयांवर आणि समाजातील व विशेषत: महिलांवर होणाऱ्या त्यांच्या परिणामांवर चर्चा घडवून आणणे.

२) वरील प्रश्नांबाबत पाश्चिमात्यांचे आंधळे अनुकरण न करता दक्षिण आशियातील आपापल्या प्रदेशाशी सुसंगत असा दष्टिकोन विकसित करणे.

३) महिला, शांती, संरक्षणासंबंधातील युनायटेड नेशन्स सिक्युरिटी काऊंसिलच्या ठराव क्र. १३२५ व १८२० चे पालन दक्षिण आशियात होते आहे की नाही यावर लक्ष ठेवणे. कारण ही जबाबदारी फक्त सरकारची नाही, तर समाजाची सुद्धा आहे.

४) त्या त्या प्रदेशांतील चांगल्या राज्यकारभाराच्या उदाहरणांचे दस्तावेजीकरण करणे व विविध समुदायांना अशा उपक्रमांत सहभागी होण्यासाठी उद्युक्त करणे, त्यासाठी त्यांच्या क्षमतेत वाढ करणे.

## कार्य-पद्धती

- प्राथमिक व आनुषंगिक संशोधन
- राष्ट्रीय व प्रादेशिक कार्यशाळा
- संपर्काचे जाळे आणि परस्पर संवाद
- विविध स्तरांवर परिवर्तनासाठी आवाहन
- अतिसंवेदनशील समुदायांशी संपर्क